© 2026 IJRTI | Volume 11, Issue 5 May 2026 | ISSN: 2456-3315

# संवादी शिक्षण पद्धतीने निबंधलेखन शिकणे: एक अभ्यास

## शिक्षक व अधिकारी कर्मचारी स्पर्धा 2025 अंतर्गत राज्यस्तरीय शोधनिबंध स्पर्धेकरिता सादर करण्यात येणारा शोधनिबंध

**संशोधक**

**डॉ.संतोष राजेश्वरराव सेलूकर**

**M.A.B.ed,D.S.M. SET,Ph.D**

**M.A.(Education),M.A.(Eng),M.A.(Subject Communication)**

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खांबेगाव ता. पूर्णा जि.परभणी**

## 1) प्रस्तावना

निबंध लेखन ही एक प्रकारची अभिव्यक्ती असते. प्राप्त ज्ञानाचा उपयोग करुन स्वत:ला आलेले अनुभव,जाणवलेल्या संवेदना, भावना, विचार, अभिव्यक्ती, मत, दृष्टीकोन, कल भाषेद्वारे मांडणे अर्थात निबंध लेखन करणे होय. निबंध लेखन म्हणजे केवळ शब्द लिहिणे नव्हे तर विचारांची मांडणी, मुद्दे तार्किक पद्धतीने मांडणे, योग्य शब्दांचा वापर करणे, विषयाबद्दलचे सखोल ज्ञान मांडणे इ.कौशल्ये त्यात अंतर्भूत असतात. विचारशक्ती, भाषिक कौशल्य, तार्किक मांडणी, सर्जनशीलता, अभिव्यक्ती इ. क्षमता अवगत करुन निबंधलेखन कौशल्य प्राप्त होते.

हे एक सृजनात्मक कौशल्य आहे. सृजनात्मक कार्यातून व्यक्तीची विचारशक्ती विकसित होते. जीवनदृष्टी सुद्धा यामुळे बदलत असते. निबंध लेखनासारख्या स्वअभिव्यक्ती कौशल्याला मराठी विषयामध्ये अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. साधारणपणे इयत्ता तिसरी पासून ते आठवी आणि त्यापुढीलही इयत्तांमध्ये निबंध लेखन हा प्रश्न हमखास परीक्षेमध्ये विचारला जातो. विद्यार्थ्यांच्या निबंधलेखनाकडे पाहिले असता असे लक्षात येते की फार कमी विद्यार्थी उत्कृष्ट निबंध लेखन करू शकतात. अगदी थोडक्या स्वरूपातले असणारे त्यांचे निबंध लेखन फारसा त्याबद्दल आत्मविश्वास देखील त्यांच्याकडे नसतो याबाबीमुळेच निबंध लेखनाचे महत्त्व समजणे त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे.

निबंध लेखनामध्ये विद्यार्थ्यांनी नवनवीन कवितेच्या ओळी, दाखले, उदाहरणे, दृष्टांत, छोट्याशा गोष्टी यांचा अंतर्भाव देखील आपल्या निबंधामध्ये केला पाहिजे आणि त्याद्वारे आपले म्हणणे पटवून दिले पाहिजे.प्राप्त असलेले ज्ञान योग्य पद्धतीने मांडणे,एखाद्या व्यक्तीचे किंवा वस्तू, प्रसंगाचे स्वतःच्या शब्दात वर्णन करणे अशा सर्व प्रकारच्या बाबी निबंधात समाविष्ट व्हाव्यात म्हणजेच विद्यार्थ्यांनी निबंधलेखनाविषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन व्हावे यासाठी प्रस्तुत संशोधन हाती घेतलेले आहे.

या क्षेत्रातील तज्ज्ञ व शिक्षक यांच्याशी बोलतांना असे लक्षात आले की गप्पा मारता-मारता संवादी शिक्षण पद्धतीने विद्यार्थ्यांच्या निबंध लेखनामध्ये सुधारणा करता येऊ शकते. पारंपारिक पद्धतीने निबंध लेखन शिकवण्यापेक्षा गप्पांच्या माध्यमातून जर निबंध लेखनाविषयी मार्गदर्शन केले तर त्यामध्ये एक प्रकारची सहजता येईल व विद्यार्थी संवाद माध्यमातून निबंध लेखन अवगत करतात.यासाठी गप्पांचे सत्र आयोजित करण्यात यावे आणि त्यामध्ये विद्यार्थ्यांना निबंध लेखनाबद्दलचे मार्गदर्शन व्हावे असा विचार पुढे आला.एखाद्या व्यक्ती किंवा स्थळाविषयी आपण कसे विधान लिहू शकतो आणि त्याचा निबंधामध्ये कसा वापर केला जाऊ शकतो या विषयी प्रामुख्याने गप्पा करणे अपेक्षित आहे.विद्यार्थ्यांची मते जाणून घेतली. त्यातून संवादी पद्धतीने गप्पा मारता-मारता निबंध लेखन शिकणे सहज विद्यार्थ्यांना जमू शकते असा विचार पुढे आला.

सदरील संशोधनात विद्यार्थ्यांच्या सोबत एक तास गप्पांचे सत्र आयोजित करून त्याबद्दल विद्यार्थ्यांना बोलते केले जाते. जे गप्पांमध्ये बोलले जाते, ऐकले जाते पुढे त्याचाच निबंध लेखनात उपयोग होतो. स्वतःचा विषय कसा निश्चित करावा, विषयाबद्दलची आपल्याला ज्ञात असलेली माहिती व त्या माहितीची शब्दांमध्ये करावयाची सुरेख मांडणी याची उदाहरणे या गप्पांमधून विद्यार्थ्यांना दिली जातात. प्रत्यक्ष निबंधांमधील विधाने कशी असतील याचाही अंदाज या गप्पांच्या सत्रामध्ये मुलांना येतो.

उदा. **1) मी पाहिलेली सर्कस या विषयी गप्पा सत्र**

1.तिथे एक प्राणी पाहिला.

2.तिथे एक **हत्तीसारखा** प्राणी पाहिला.

3.तिथे एक हत्तीसारखा **धिप्पाड** प्राणी पाहिला.

4.तिथे एक धिप्पाड प्राणी नव्हे तर जणू हत्तीच असावा.

5.धिप्पाड असणा-या प्राण्यांची माझी भेट झाली आणि मला तो हत्ती बोलला, सर्कस

पाहणारी मुलं किती आनंदी आहेत आम्ही मात्र या सर्कसमध्ये बंदिस्त आहोत.



*Figure 1.*

**2) गप्पा सत्रातील चित्रावरुन निबंध लेखन**

(केळीच्या झाडाचे चित्र दाखवणे)



*figure 2.*

विद्यार्थी निरीक्षण करतात. शिक्षक विद्यार्थ्यांना बोलते करतात.

वि 1: हे केळीचे झाड खूप सुंदर आहे. (वर्णन)

वि.2: हे केळीचे झाड फळांनी वाकलेले दिसत आहे. (चित्रवर्णन)

वि.3: केळीच्या झाडाला फांद्या नसतात (माहितीपर)

वि.4: एकही बी नसलेले फळ म्हणजे केळी असते, त्याच केळीचे हे घड म्हणजे आईच्या अंगावर खेळणारी जणू मुलेच आहेत. (माहिती आधारे वर्णन)

वि.5: झाडाकडे पाहून मला असे वाटले की त्याला एका जागेवर असे का बंदी केले असेल, विचा-याला खेळता बागडताही येत नाही. (मुक्त कल्पना)

वि.6: हेच झाड मला भेटले होते ते बोलले, अरे बाळांनो रासायनिक खते आणि तणनाशके वापरुन सारेच शेतकरी माझं आनंदी आणि स्वच्छंदी जगच संपवायला निघालेले आहेत. (सर्वसमावेशक )

अशा प्रकारे संवादी पद्धतीने गप्पांना सुरुवात होते. प्रत्येक मुलगा आपले विधान मांडतो त्यात काही विधाने माहितीपर विधाने असतात. काही वर्णन करणारी विधाने असतात. काही

संमिश्र विधाने असतात. काही मुक्त काल्पनिक असतात. काही सर्वसमावेशक विधाने असतात. ही सर्व विधाने कशा प्रकारची आहेत हे शिक्षक त्यांना वेळोवेळी गप्पा सत्रात स्पष्ट करत असतात. अशा शिक्षक-विद्यार्थी परस्पर गप्पांमुळे मुले खूप छान प्रकारे निबंध लेखन शिकतात याविषयी अधिक अभ्यास करणे यासाठी प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले आहे.

आजच्या शालेय शिक्षणात भाषा शिक्षणाचे एक प्रमुख उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना आपल्या विचारांनाअचूक, सुव्यवस्थित आणि परिणामकारक रितीने व्यक्त करता येणे. या अभिव्यक्ती साठी निबंध लेखन हा एक प्रभावी मार्ग आहे. परंतु प्रत्यक्षात अनेक विद्यार्थ्यांना निबंध लिहिताना भीती, संकोच, कल्पनांची कमतरता किंवा भाषिक असहजता इ.अंतर्गत घटकाबरोबरच कंटाळा, एकाग्रता या सारखे बाह्यघटकही कारणीभूत असल्याचे जाणवते. अशा वेळी पारंपारिक शिक्षण पद्धतीपेक्षा **गप्पा मारता मारता निबंध लेखन सारखी संवादी पद्धती** अधिक परिणामकारक ठरते. संवाद करतांना भाषा शिक्षणात विद्यार्थ्यांच्या विचारशक्ती, कल्पनाशक्ती आणि अभिव्यक्ती कौशल्याचा विकास होणे अपेक्षित असते.

परंतु आज अनेक विद्यार्थ्यांना निबंध लेखन हा ताणतणावपूर्ण आणि कंटाळवाणा विषय वाटतो. या पार्श्वभूमीवर गप्पा मारता मारता निबंध लेखन ही पद्धत विद्यार्थ्यांना लेखनासाठी प्रोत्साहन, प्रेरणा आणि आत्मविश्वास देते. विद्यार्थी गप्पांच्या सत्रात स्वत:चे अनुभव,आनंद, आठवणी आणि माहिती सांगतो त्याचेच तर निबंधामध्ये रुपांतर होत असते आणि तयार होतो निबंध!

गप्पांमध्ये विद्यार्थी ज्या सहजतेने आपल्याला आलेले अनुभव, विचार, कल्पना, किंवा एखाद्या प्रसंगाचे वर्णन करतो, स्वत:चे मत मांडतो,कल दर्शवतो अथवा दृष्टीकोन मांडत असतो तेवढी सहजता त्याच्या लेखनात अशा गप्पाच्या सत्रामुळे येऊ शकते.त्यातून त्याचे निबंधलेखन अधिकाधिक प्रभावी व समृद्ध होत जाते.

- **2) संशोधनात आलेल्या शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या:**

  - **संवादी शिक्षण पद्धती (गप्पा) :**

    हा शब्द संस्कृतमधील 'गद्' (बोलणे) या धातूपासून बनला असून **गप्पा** म्हणजे बोलणे, संवाद साधणे, परस्पर विचारांची देवाणघेवाण करणे. **शब्द निर्मिती:** संस्कृत 'गद्' (बोलणे) → प्राकृत 'गप्प' → मराठी 'गप्पा'

    **'गप्पा' शब्दाची व्याख्या**: गप्पा म्हणजे हलक्याफुलक्या वातावरणात दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये होणारा संवाद, ज्यामध्ये विचार, अनुभव, माहिती किंवा भावना यांची

देवाणघेवाण होते. शिक्षणप्रक्रिया एकतर्फी न राहता आंतरक्रिया प्रश्नोत्तर संवाद माध्यामातून होते, अनुभवांची देवाणघेवाण होत असते. या गप्पामध्ये सहजता असते.

**विद्यार्थ्यांसाठी सोपी व्याख्या:** गप्पा म्हणजे एकमेकांशी आनंदाने बोलणे. उदा. मित्रमैत्रिणी शाळेच्या सुट्टीत एकमेकांशी गप्पा मारतात.

- **निबंध**'

**शब्दाची उत्पत्ती:-** निबंध हा शब्द संस्कृत भाषेतील नि + बंध या शब्दापासून तयार झाला आहे. नि म्हणजे 'निश्चितपणे' किंवा 'ठराविक रितीने ''बंध' म्हणजे बांधणे

**निबंधाची साधी व्याख्या:-** निबंध म्हणजे एखाद्या विषयावर आपल्या विचारांना, कल्पनांना आणि माहितीला सुव्यवस्थितपणे मांडलेले लेखन.उदा. 'माझा आवडता सण दिवाळी' या विषयावर आपण आपले अनुभव, आनंद, आठवणी आणि माहिती सांगतो, तोच निबंध!

- **3) शोधनिबंधाची गरज (Need of the Study):**

- **विद्यार्थ्यांच्या भाषिक अभिव्यक्तीचा विकास** :- निबंध लेखनात भाषेचा योग्य वापर आणि विचारांची मांडणी आवश्यक असते. गप्पांच्या माध्यमातून विद्यार्थी आपल्या अनुभवांबद्दल सहज बोलतात. या गप्पा त्यांच्या अभिव्यक्ती क्षमतेला चालना देतात.
- **निबंध लेखनातील भीती व संकोच दूर करणे** :- अनेक विद्यार्थी निबंध लेखनाला कठीण समजतात.त्यात होणा-या चुकाची त्यांना सतत भीती वाटत असते.गप्पांच्या वातावरणात ते मोकळेपणाने बोलतात, त्यामुळे लेखनाची भीती दूर होते.
- **संवादातून विचारांची देवाणघेवाण** :- गप्पा मारताना विद्यार्थी एकमेकांचे विचार ऐकतात, नवे दृष्टिकोन मिळवतात आणि आपल्या विचारांना आकार देतात. यामुळे निबंधातील विषय अधिक समृद्ध होतो.
- **आनंददायी सहज शिक्षणासाठी** :- संवादाधारित पद्धतीमुळे वर्गातील वातावरण हलकेफुलके होते. विद्यार्थी सक्रिय सहभाग घेतात आणि निबंध लेखन हा एक आनंददायी अनुभव बनतो.
- **निबंध लेखनात सर्जनशीलतेला वाव** :- गप्पांमधून कल्पना, अनुभव आणि आठवणी बाहेर येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती विकसित होते आणि त्यांचे लेखन अधिक आकर्षक बनते.

- **शिक्षकांना नवीन अध्यापन पद्धतीचा उपयोग** :- गप्पांसारख्या संवादी पद्धतीने निबंध शिकवताना शिक्षक विद्यार्थ्यांच्या मानसिक स्तराशी जवळीक साधतात. यामुळे शिक्षण अधिक प्रभावी आणि वैयक्तिक होते.
- **भाषिक कौशल्यांचे एकत्रीकरण :-** बोलणे, ऐक णे, वाचन आणि लेखन ही चारही कौशल्ये गप्पांच्या प्रक्रियेत आपोआप विकसित होतात.

- **4) महत्त्व (Importance )**

❖ **विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण :-** गप्पांमधून विद्यार्थी आपले विचार शब्दांत मांडायला शिकतात.हे विचार जेव्हा लिखित स्वरूपात उतरतात, तेव्हा त्यांचे लेखन कौशल्य, वाक्यरचना आणि भाषेचा वापर सुधारतो.

❖ **विद्यार्थ्यांची बोलण्याची व ऐकण्याची क्षमता वाढते:-** गप्पा म्हणजे संवाद,या प्रक्रियेत विद्यार्थी इतरांचे विचार ऐकतात आणि स्वतःचे विचार व्यक्त करतात. यामुळे त्यांची संवाद कौशल्ये (Speaking & Listening Skills) वाढतात.

❖ **निबंध लेखनात आत्मविश्वास निर्माण करते** :- गप्पांच्या वातावरणात विद्यार्थी भीतीविरहित, मोकळेपणाने बोलतात, त्यामुळे निबंध लेखनाची भीती नाहीशी होते आणि आत्मविश्वास वाढतो.

❖ **अध्ययन अध्यापन प्रक्रिया आनंददायी बनते** :- पारंपरिक शिकवणीपेक्षा गप्पांद्वारे शिकवलेले धडे आनंददायी, सजीव आणि विद्यार्थ्यांच्या सहभागावर आधारित असतात. अशा शिक्षणात विद्यार्थी सक्रिय राहतात आणि शिकलेले ज्ञान दीर्घकाळ लक्षात राहते.

❖ **सर्जनशीलता आणि कल्पनाशक्तीचा विकास** :- गप्पांच्या माध्यमातून विद्यार्थी स्वतःच्या अनुभवांवरून नवे विचार सुचवतात.त्यामुळे त्यांच्या लेखनात सर्जनशीलता, मौलिकता आणि भावनात्मकता येते.

❖ **शिक्षकांसाठी नवीन अध्यापन पद्धती** :- या संशोधनातून शिक्षकांना एक नवीन, प्रयोगशील आणि विद्यार्थी-केंद्रित अध्यापन पद्धत समजते. शिक्षक विद्यार्थी संवादातून त्यांची क्षमता, आवड आणि अडचणी ओळखू शकतात.

❖ **भाषा शिक्षणातील सर्व कौशल्यांचा समन्वय** :- गप्पा पद्धतीत बोलणे, ऐकणे, वाचणे आणि लिहिणे ही सर्व कौशल्ये एकत्र वापरली जातात.यामुळे भाषेचे सर्वांगीण शिक्षण घडते.

- **सामाजिक संवाद आणि सहकार्य वाढते** :- गप्पा मारताना विद्यार्थी एकमेकांचे विचार आदराने ऐकतात, उत्तर देतात आणि चर्चा करतात. यातून सामाजिक संवाद, सहकार्य आणि सहानुभूती ही मूल्ये विकसित होतात.

- **5) उद्दिष्टे (Objectives)**

1) विद्यार्थ्यांना निबंध लेखनात येणा-या आडचणीचा शोध घेणे.
2) विद्यार्थ्यांमधील निबंध लेखना बाबतची भीती दूर करणे.
3) विद्यार्थ्यांच्या निबंध लेखनात गप्पांच्या माध्यमातून सुधारणा करणे
4) गप्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना लेखनाची प्रेरणा देणे.

- **6) संशोधनाची व्याप्ती (Scope of the Study)**

प्रस्तुत संशोधन **जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खांबेगाव** ता. पूर्णा जिल्हा परभणी येथील इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांच्या मराठी विषयातील निबंधलेखनासंबधीचे आहे. संशोधनासाठी निवडलेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या 79 आहे. **निवड यादृच्छिक पद्धतीने** (Random selection) पद्धतीने करण्यात आली आहे. संशोधनाचा कालावधी सप्टे. 2025 ते नोव्हे. 2025 तीन महिने एवढाआहे.

- **7) संशोधनाच्या मर्यादा (Limitations of the Study)**

प्रस्तुत संशोधन केवळ **जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खांबेगाव** ता. पुर्णा जिल्हा परभणी शाळेतील (79) विद्यार्थ्यांपुरते मर्यादित असून अभ्यासात फक्त मराठी विषयातील 'निबंध लेखन' या घटकावर भर दिला आहे. या संशोधनात फक्त गप्पा पद्धतीने अर्थात संवादी शिक्षण पद्धतीचा वापर करून निबंध लेखन शिकण्याबाबतचा अभ्यास करण्यात आलेला आहे; इतर भाषा कौशल्यांचा म्हणजेच वाचन, श्रवण इ. कौशल्याबाबत विचार करण्यात आलेला नाही.

- **8) संशोधनाची पद्धती (Method)**

- **सर्वेक्षण पद्धत (Survey Method)**

ही पद्धत एखाद्या गटातील लोकांचे मत, अनुभव, निरीक्षण किंवा वर्तन जाणून घेण्यासाठी वापरली जाते. शिक्षणात विद्यार्थ्यांचे दृष्टिकोन व प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी ही पद्धत अत्यंत

उपयुक्त आहे.‘**संवादी पद्धतीने गप्पा मारता-मारता निबंध लेखन शिकणे**’ या उपक्रमाचा विद्यार्थ्यांच्या निबंधलेखनात सुधारणा करण्यासाठी किती प्रमाणात उपयोग होतो, त्यांनी या पद्धतीविषयी काय अनुभव घेतले,या संवादी पद्धतीने निबंध लेखन शिकण्याबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण पद्धत सर्वात योग्य ठरत असल्यामुळे या पद्धतीची निवड करण्यात आली.गप्पा सत्रासारखी नाविन्यपूर्ण शिक्षण पद्धती शिक्षकांसाठी कितपत योग्य आहे हे देखील या सर्वेक्षणावरुन पाहता येते.

- **पूर्व चाचणी: निबंधलेखनात येणा-या आडचणीचा शोध :-**

पूर्व चाचणीत विद्यार्थ्यांच्या निबंध लेखनात कोणत्या आडचणी आहेत हे पाहण्यासाठी सर्वप्रथम पूर्वचाचणी घेतली त्यानुसार ‘माझा आवडता सण’ हा विषय देऊन इयत्ता सहावी सातवी वर्गातील विद्यार्थ्यांना निबंध लेखन करण्यास सांगितले. त्यांचे निबंधलेखन खालील निकषाव्दारे तपासले.

| **अ क्र.** | **निकष** | **गुण** |
|---|---|---|
| 1) | शीर्षकाशी सुसंगत मांडणी व वाक्यरचना | 2 गुण |
| 2) | निबंधाची सुरूवात | 2 गुण |
| 3) | उदाहरणे, दाखले व कवितेच्या ओळी इ.संदर्भ | 2 गुण |
| 4) | निबंधाची आशयानुरुप भाषाशैली | 2 गुण |
| 5) | निबंधाचा शेवट | 2 गुण |

सहावा (40) सातवा (39) एकूण 79 विद्यार्थ्यापैकी 75 विद्यार्थी निबंध लेखन पूर्वचाचणीस उपस्थित होते. प्रत्येक निकषानुसार सरासरी गुण घेणारी विद्यार्थी संख्या खालील आलेखात दर्शविण्यात आली आहे.





*Figure 3* निबंधलेखनाची सरासरी

गप्पांच्या सत्रात प्रथम निबंध लेखन करतांना कोणत्या अडचणी आल्या हे विद्यार्थ्यांनी सांगितले. प्रत्येकाच्या वेगवेगळ्या अडचणी दिसून आल्या या अडचणीमधील समानता लक्षात घेऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनां निबंध लेखनात कोणकोणत्या अडचणी येतात याचा शोध घेण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांना निबंधलेखनासाठी खालील प्रकारच्या अडचणी येतात असे दिसून आले.

1. विद्यार्थ्यांच्या निबंध लेखनाचे स्वरुप, व्याख्या, संकल्पना स्पष्ट नसणे, निबंधलेखन कसे करावे याबाबत माहिती विद्यार्थ्यांना नाही.

2. निबंध लेखनात योग्य शब्द वापरुन वाक्यरचना करतांना अडचणी येतात.

3.विद्यार्थ्यांना स्वत:ला ज्ञात असलेल्या बाबी योग्य वाक्यात अभिव्यक्त करतांना अडचणी येतात.

4)निबंधाची सुरुवात कशी असावी, मध्य, शेवट याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती नाही.

5)निबंध लेखनात पाच सात ओळी नंतर पुढे काय लिहावे कळत नाही म्हणून अर्धवट निबंध लेखन करतात.

6) निबंध लेखनातील वाक्यांची पुनरावृत्ती झालेली आहे.

7)एखाद्या व्यक्तीचे, प्रसंगाचे वर्णन करतांना विशेषणे लावतांना अडचणी येतात.

### नमुना (Sample)

जनसंख्या /लोकसंख्या (Population): इयत्ता 6 वी व 7 वी चे विद्यार्थी

नमुना निवड: यादृच्छिक पद्धतीने (Random Sampling Method)

विद्यार्थ्यांची संख्या: 79 (40 सहावी + 39 सातवी)

शिक्षकांची संख्या: 2 (मराठी विषय शिक्षक)

### सर्वेक्षण साधने (Tools for Data Collection)

1. प्रश्नावली (Questionnaire) – विद्यार्थ्यांसाठी
2. निरीक्षण पत्रक (Observation Sheet) उपक्रमातील विद्यार्थी सहभाग नोंदविण्यासाठी

### प्रश्नावलीची रूपरेषा

**(काही उदाहरणार्थ प्रश्न खाली दिले आहेत)**

**विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली:**

1. तुला निबंध लिहायला आवडते का?
2. निबंध लिहिताना तुला काय कठीण वाटते?
3. गप्पा मारून निबंध लिहिण्याची पद्धत तुला सोपी वाटली का?
4. या पद्धतीने तुला विचार सुचले का?
5. या उपक्रमानंतर निबंध लिहिण्याबद्दल आत्मविश्वास वाढला का?

6.गप्पा मारता-मारता निबंध लेखन पद्धत राबवताना कोणत्या अडचणी आल्या?

7. लेखनात काय बदल झाले?

विद्यार्थ्यांच्या या अडचणी लक्षात आल्या. त्यावर उपाय योजना म्हणून गप्पांचे सत्र आयोजित केले. (40) विद्यार्थी एकत्र बसवून त्यांच्याबरोबर शिक्षक गप्पा सुरु करतात. प्रत्येक जण गप्पांमध्ये सहभागी होईल यासाठी प्रश्न विचारले. प्रत्येक अडचणीवर गप्पांमधून विद्यार्थ्यांना उत्तरे मिळाली.निबंध म्हणजे काय व तो कसा लिहावा स्वरुप समजले. सुरुवात शेवट व मध्य कसा असावा या विषयी मुलांनी गप्पांमधून जाणून घेतले. अर्धवट निबंध लेखन करणा-यांनी व्यक्ती प्रसंग स्थळ घटना इ चे वर्णन करायला शिकावे त्यामुळे निबंध पूर्ण होतो. गोष्टी गाणी कविता उदाहरणे दाखले निबंधात वापरावे याबद्दल गप्पांमधून मुलांना समजले.गप्पा मारतांना हेतू दूर जाणार नाही याची दक्षता घेतली.

### कार्यपद्धती :

विद्यार्थ्यांना 'निबंध म्हणजे काय' हे समजावण्याची पद्धत

**(अ) उदाहरणातून समजावणे**

फळ्यावर लिहिणे – 'माझा शाळेचा पहिला दिवस' विद्यार्थ्यांना विचारणे त्या दिवशी तुम्ही काय केलंत? तुम्हाला कोण भेटले? कसे वाटले? त्यांच्या उत्तरांवरून त्यांना सांगितले, हेच तुम्ही निबंधात लिहू शकता म्हणजे एखाद्या विषयावर आपले विचार मांडणे.

**(आ) चित्रावरून निबंध लेखन**

फळ्यावर एखादे चित्र दाखवले – उदा. 'शाळेचा प्रांगण' 'खेळाचे मैदान' विद्यार्थ्यांना विचारले, "चित्रात काय दिसते?" त्यांच्या बोलण्यावरून त्यांना सुचवले – "हेच तुमचे विचार आहेत. हे वाक्यरूपात लिहा, तर तोच निबंध होतो."

**(इ) संवादी पद्धती (गप्पांच्या रूपात)**

गप्पा मारत-मारत विषयावर चर्चा करा, मग त्याच गप्पांचा उपयोग करून विद्यार्थ्यांकडून निबंध लिहून घ्यायला सुरुवात केली. उदा. 'आपला आवडता ऋतू कोणता?' सगळ्यांनी सांगितलेल्या गोष्टी लिहून घेतल्या की, निबंध तयार होतो. विषय लहान आणि विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित राहतील याचा विचार केला. सुरुवातीला ५–६ वाक्यांचा छोटा निबंध लिहायला लावला. हळूहळू परिच्छेद वाढवायला सांगितला. येथे निबंधाच्या रचनेवर भर द्यावा लागला: सुरुवात (प्रस्तावना) मध्यभाग (मुख्य विचार) शेवट शिक्षक विद्यार्थ्यांशी विविध विषयावर गप्पा मारतात आणि त्यातून नवे विचार व अनुभव मिळतात.उदा. — 'आपण दिवाळीत काय करता?' या गप्पांमधून विद्यार्थी 'माझा आवडता सण – दिवाळी' निबंध सहज लिहू शकले. उपक्रमानंतर विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्यात झालेला बदल निरीक्षणपत्रकाव्दारे मोजण्यात आला.

**उत्तर चाचणी :**

संवादी पद्धतीने गप्पा मारता मारता निबंध लेखनासाठी गप्पाचे सत्र आयोजित करण्यात आले. गप्पाव्दारे विद्यार्थी अभिव्यक्तीला संधी मिळते.एक तास भर विद्यार्थी-शिक्षक व विद्यार्थी-विद्यार्थी अंतरक्रिया घडते.त्यातून विद्यार्थी लेखन प्रेरणा घेतात.उत्तर चाचणीसाठी मी पाहिलेली बाग हा विषय निबंध लेखनासाठी देण्यात आला.निबंध लेखनात निकषानुसार प्राप्त गुण घेणा-या विद्यार्थ्यांची सरासरी विद्यार्थी संख्या सोबतच्या आकृती क्र. 3. मध्ये दर्शविली आहे.

- **9. माहिती संकलन प्रक्रिया**

विद्यार्थ्यांना सर्वप्रथम पूर्व चाचणीसाठी निबंध लेखन करावयास सांगितले. पाच निकषानुसार गुणदान करुन सरासरी विद्यार्थीसंख्या सोबतच्या आकृती क्र.3 मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.एक

प्रश्नावली वितरित केली. उपक्रमाच्या आधी व नंतर दोन्ही वेळा माहिती गोळा केली. प्रतिसाद लेखी स्वरूपात नोंदवले. मिळालेली माहिती वर्गीकृत करून तक्ते तयार केले.

- **10. माहिती विश्लेषण (Data Analysis)**

विद्यार्थ्यांच्या निबंधाला 10 पैकी गुणदान करुन टक्केवारी काढली.

निरीक्षण पत्रकावरून गुणात्मक निष्कर्ष काढले.

(उदा. :- 75% विद्यार्थ्यांना गप्पा पद्धत आवडली, 60% विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास वाढल्याचे सांगितले इ.)

- **11. निष्कर्ष (Findings) (उद्दिष्ट निहाय)**

  - **उद्दिष्ट 1.विद्यार्थ्यांना निबंध लेखनात येणा-या अडचणीचा शोध घेणे.**

    1. विद्यार्थ्यांना निबंध लेखन करतांना विविध प्रकारच्या अडचणी येतात.

    2.अधिकाधिक विद्यार्थ्यांना निबंधाची सुरुवात, मध्य, शेवट कसा करावा यासंबधी अडचणी आहेत.

    3.निबंध लेखन करतांना योग्य सुविचार, उदाहरणे, दाखले, कवितेच्या ओळींच्या वापराबाबत अडचणी येतात.

    4.निबंधात काय लिहावे सुचत नाही ही अडचण सर्वाधिक मुलांना आहे.

    5.विद्यार्थ्यांना निबंध लेखन करतांना चुका होण्याची भीती वाटते.

  - **उद्दिष्ट 2. विद्यार्थ्यांमधील निबंध लेखना बाबतची भीती दूर करणे.**

    1. गप्पांची विविध सत्रे आयोजनामुळे विद्यार्थी आनंदी वातावरणात निबंधलेखन शिकतात.
    2. गप्पासत्रातून विद्यार्थ्यांच्या निबंध लेखनामधील चुका सुधारतात.
    3. विद्यार्थ्यांनी गप्पासत्रात सक्रिय सहभाग घेतल्यामुळे निबंध लेखनाबाबतची भीती दूर होते.

- **उद्दिष्ट 3. विद्यार्थ्यांच्या निबंध लेखनात गप्पांच्या माध्यमातून सुधारणा करणे.**
    1. संवादी पद्धतीने निबंध लेखन केल्यामुळे अडचणी ज्या त्या टप्प्यावरच दूर होतात.
    2. गप्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना लेखनाची प्रेरणा मिळते.
    3. 90 %पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना गप्पांमधून निबंध लिहिणे आवडले.

- **उद्दिष्ट 4. संवादी पद्धतीने निबंध लेखन करतांना विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.**

    1.सातत्याने गप्पासत्रात सहभागामुळे निबंधलेखनाबाबतचा आत्मविश्वास वाढतो.

    2. 75% पेक्षा अधिक विद्यार्थ्यांमध्ये निबंध लिहिताना वाटणारी भीती, संकोच कमी झाला.

    3.शिक्षकांना वर्गात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढलेला दिसला.

    4.विद्यार्थ्यांच्या विचारमांडणी व शब्दसंपदेत सुधारणा झाली.

    5.विद्यार्थ्यांचे निबंध लेखन गप्पांच्या सत्रामुळे सुधारले

    6.गप्पांसत्रात विद्यार्थी विषय अधिक सहज समजतात आणि आनंदाने लिहितात.

- **12. शिफारशी**

    - **विद्यार्थ्यांसाठी**

        - 1.विद्यार्थ्यांनी संवादी पद्धतीने आयोजित गप्पांसत्रामध्ये भाग घेऊन संवाद करावा
        - 2.गप्पासत्रातील संवादातून स्वत:च्या निबंधामध्ये वेळोवेळी सुधारणा करावी व सातत्याने नाविन्यपूर्ण पद्धतीने निबंध लेखन करावे.

- **शिक्षकांसाठी**
    - 1.मराठी विषयात निबंध लेखन कौशल्य अवगत व्हावे यासाठी ही पद्धत शिक्षकांनी वापरावी.
    - 2.वर्गात गप्पांद्वारे लेखनाची सवय लावल्यास भाषिक कौशल्य वाढते.
    - 3.इतर विषयांमध्येही विद्यार्थ्यांचे विचारप्रदर्शन घडविण्यास ही पद्धत वापरता येते.
- **शाळा /संस्थासाठी**
    - 1.मराठी विषयात निबंध लेखन शिकवण्यासाठी ही पद्धत वापरण्यासाठी शिक्षकांना प्रोत्साहित करावे.
    - 2. निबंधस्पर्धांचे वेळोवेळी आयोजन करुन उत्कृष्ट निबंध लेखनास पारितोषिके देण्यात यावी.
    - 3.उत्कृष्ट निबंधलेखन संग्रहित करुन त्याला शाळेच्या वर्षिकांकामध्ये पुरेशी प्रसिध्दी द्यावी.

## संदर्भ ग्रंथ

आगलावे प्रदीप *(2000) संशोधन पध्दती व तंत्रे* विद्या प्रकाशन नागपूर

जगताप ह.ना. (*1994) प्रगत शौक्षणिक तंत्रज्ञान* नूतन प्रकाशन पुणे

माळी नामदेव *(2010 )संपादन शाळकरी मुलांच्या कविता* कवितासंग्रह

हातवळणे अरुणा (*2012*) *निबंधमाला* शब्दगंध प्रकाशन पुणे